पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/५४७८७७/२०२३ पिंपरी-चिंचवड    दिनांक- ०१/१२/२०२३

**प्रेसनोट दि. ०१/१२/२०२३**

**एका महिन्यात तब्बल ३२७७५ वाहनधारकांवर कारवाई, सुमारे २ करोड ७२ लाख रु दंड आकारणी**

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, चिखर्ली ही आयटी पार्क क्षेत्रे असुन देहु व आळंदी हि संतांची भुमी आहे. पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत पिंपरी बाजारपेठ हि पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत सर्वात मोठी बाजारपेठ आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता त्याअनुषंगाने राज्यातील तसेच देशातील नागरीक हे उदरनिर्वाहाकरीता पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात स्थायीक झालेने शहराचा विकास तसेच वाढ हि वेगाने होत आहे. नागरीक आपले दळण वळणाकरीता दुचाकी तसेच चारचाकी वाहनांचा वापर करत असल्याने वाहनांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढल्याने वाहनांशी निगडीत अपराधांमध्ये तसेच वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघनात वाढ झालेली आहे. वाहन चालकांना वाहतुकीचे नियम मोडण्यास वेळीच प्रतिबंध करणेकरीता पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेकडून दैनंदिनरित्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येत असते.

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे यांचे आदेशाने पोलीस सह आयुक्त संजय शिंदे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी सो यांचे मार्गदर्शनाखाली पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत वाहतुक शाखेमार्फत दिनांक ०१/११/२०२३ ते ३०/११/२०२३ दरम्यान खालील प्रमाणे विशेष हेडखाली कारवाई करण्यात आलेली आहे.

मोबाईल टॉकिंग-९३९, सिग्नल जंम्पींग- १७२८, ट्रिपल शिट- ३५५९, विना हेल्मेट- २८८०, विदाऊट सिटबेल्ट- २२२०, काळी काच- १३९०, सायलेंसर- ८८४, वाहतूक अडथळा- ८९६७ तसेच बीआरटी मार्गिकेमध्ये प्रवेश करणाऱ्या ३२२९ वाहनांवर कारवाई करण्यात आलेली असून जड अवजड वाहनांस प्रवेश बंदी केलेल्या मार्गावर प्रवेश करणाऱ्या ६३७२ जड अवजड वाहनांवर करवाई करण्यात आलेली आहे. तसेच रॉंग साईड वाहन चालविणारे ६०७ वाहन चालकांवर सेंड टू कोर्ट केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारे एकुण ३२७७५ वाहनचालकांवर करवाई करण्यात आलेली असून २,७२,९१,७००/- रुपये दंड आकारण्यात आलेला आहे.

तरी नागरीकांनी वाहतूक नियमांचे पालन करुन त्यांचेवर होणारी दंडात्मक तसेच न्यायालयीन कार्यवाही टाळावी असे आवाहन पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेकडुन करण्यात येत आहे.

01/12/2023

(बापू बांगर)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक शाखा,पिंपरी चिंचवड शहर

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिद्धी अधिकारी, नवीन मध्यवर्ती इमारत पुणे

प्रत : १) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

Scanned with OKEN Scanner